# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ-१०९८/प्र.क्र. २३०/९८/पंरा
नवीन प्रशासकीय भवन,
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.

दिनाक २१ एप्रिल १९९८

## परिपत्रक

**विषय :** ग्रामपंचायतीच्या निवडणूकांमधील सदस्य पदांचे आरक्षण

भारताच्या संविधानातील अनुच्छेद २४३ डी चे उपकलम (१) मधील तरतुदीनुसार प्रत्येक पंचायतीमध्ये अनुसूचित जातीसाठी, व अनुसुचित जमातीसाठी सदस्य पदांच्या राखून ठेवावयाच्या जागा यात्या पंचायत क्षेत्रामधील अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या लोकसंखेच्या त्या क्षेत्रातील एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणात राखीव ठेवण्याची तरतूद आहे. तसेच सदर अनुच्छेदाच्या उपकलम (३) नुसार पंचायतीच्या एकूण जागांच्या संख्येच्या १/३पेक्षा कमी नसतील एवढ्या जागा (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी राखीव ठेवलेल्या जागा धरून) महिलांसाठी राखून ठेवण्याची तरतूद आहे. तसेच उक्तअनुच्छेदाच्या उपकलम (६) अन्वये राज्याच्या विधान मंडळास मागासवर्गीय नागरिकांसाठी पंचायतीमधील जागा राखून ठेवण्याकरीता तरतूद करण्यास प्रतिबंध असणार नाही, अशी तरतूद आहे.

२. संविधानाच्या अनुच्छेद २४३-डी मधील उपरोक्त तरतुदींनुसार मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १० मधील उपकलम (२) मधील खंड (अ) नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यामधील व्यक्ति आणि स्त्रिया यांच्यासाठी जागा राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

३. उक्त कलमाचे उपकलम (२) चा खंड (ब)नुसार अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या व्यक्तिंसाठी राखून ठेवावयाच्या जागांच्या त्या पंचायतीमधील प्रत्यक्षात निवडणूकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण हे जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर त्या पंचायत क्षेत्रातील अनुसूचित जातीच्या किंवा यथास्थिती अनूसूचित जमातीच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्रच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल आणि त्यामधील परंतुकानुसार अशारितीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येशी १/३ पेक्षा कमी नसतील एवढ्या जागा अनुसूचित जाती किंवा प्रकरणपरत्वे अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील, अशी तरतूद केलेली आहे.

४. संविधनातील अनुच्छेद २४३-डी च्या उपकलम (६)मधील तरतुदीनुसार मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १०चे उपकलम (२)चा खंड (क) अन्वये मागासवर्गीय नागरिकांच्या प्रवर्गासाठी पंचायतीमधील एकूण जागांच्या २७ टक्के जागा आरक्षित केलेल्या आहेत आणि सदर खंड (क) च्या परंतुकानुसार अशारितीने आरक्षित केलेल्या जागांच्या एकूण संखेच्या १/३ जागा नागरीकांचा मागासवर्गीय प्रवर्गातील स्त्रीयांसाठी ठेवण्यात राखून येतील, अशी तरतूद केलेली आहे.

५. प्रत्येक पंचायतीमधील थेट निवडणूकीद्वारे भरावयाच्या एकूण जागांच्या १/३ पेक्षा कमी नसतील एवढया जागा (अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या तसेच नागरिकांचा मागासवर्गीय प्रवर्गाच्या महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरून) महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील, अशी तरतूद आहे.

६. त्याचप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे आणि जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ अन्वये उपरोक्त तरतूदींच्या आधारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्गीय प्रवर्ग आणि स्त्रीया या चार गटातील व्यक्तिंसाठी ग्रामपंचायतीमधील सदस्य पदांच्या जागा आरक्षित केलेल्या आहेत.

७. वर नमूद केलेल्या संविधानीक तसेच कायदेशीर तरतूदींमध्ये कोणतीही जागा, '' पुरूष राखीव '' अशी आरक्षित नाही. त्यामुळे राखीव जागा दर्शविताना सर्व साधारण जागा, मागासवर्गीय प्रवर्गाच्या जागा, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या जागा व आवश्यक तेथे त्या त्या प्रवर्गातील स्त्री राखीव जागा, इतक्याच जागा राखीव दर्शविण्यात याव्यात.

८. स्त्री राखीव जागेव्यतिरिक्त प्रत्येक प्रवर्गात इतर ज्या जागा असतात त्या जागांवर सुद्धा संबंधित प्रवर्गातील स्त्री उमेदवार निवडणूक लढवू शकते. अशा परिस्थितीत '' सर्व साधारण पुरुष '' जागा दर्शविणे किंवा '' मागासवर्गीय प्रवर्गातील पुरूष राखीव ''

जागा दर्शविल्याने तसेच " अनुसूचित जाती/जमातीचे पुरूष राखीव " जागा दर्शविल्याने अशा जागांवर स्त्री उमेदवार निवडणूक लढवू शकणार नाही, असा समज एखाद्या अधिकाऱ्याने करून घेतल्यास अशी जागा लढविण्यापासून स्त्री उमेदवार वंचित राहील आणि त्यामुळे अशाप्रकारे " पुरूष राखीव " जागा दर्शविणे हे असंविधानिक तसेच बेकायदेशीर आहे.

९. ग्रामपंचायतीमधील थेट निवडणूकीद्वारे भरावयाच्या जागांचे आरक्षण दर्शविताना फक्त उपरोक्त चार गटांबाबतच म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय प्रवर्ग व स्त्रिया यांच्यासाठी राखीव जागा आहेत. सर्वसाधारण जागा किंवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्गीय प्रवर्ग यामधील स्त्रिया सोडून अन्य **राखीव जागांबाबत " पुरूष राखीव असा उल्लेख कटाक्षाने टाळावे.**

राज्य निवडणूक आयुक्तांचे आदेशानुसार,

**(अर्पणा जोशी)**

अवर सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत —

(१) सर्व विभागीय आयुक्त,

(२) सर्व जिल्हाधिकारी,

(३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

(४) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई